# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date 9 October 2026
# Time 7.10 to 7.20 AM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- दुष्काळी परिस्थिती पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचं पथक राज्यात दाखल; प्रशासनाकडून सविस्तर सादरीकरण
- केंद्रीय पथक आज छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतल्या गावांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी करणार
- दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमध्ये मागणी करणाऱ्या प्रत्येकास मोफत अन्नधान्य उपलब्ध करुन द्यायचे राज्य सरकारचे निर्देश
- प्रारुप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांसाठी येत्या शनिवार-रविवारी विशेष नोंदणी शिबीर

आणि

- राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमात धाराशिव जिल्हा राज्यात अव्वल

****

दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचं आंतरमंत्रालयीन पथक काल महाराष्ट्राच्या दौऱ्यावर दाखल झालं. राज्य सरकारकडून काल मुंबईत या पथकासमोर दुष्काळी स्थितीचं सविस्तर सादरीकरण करण्यात आलं. पाणीटंचाई, टँकर्सची आवश्यकता, शेतमजूर तसंच जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांच्या स्थलांतराची शक्यता आदी बाबींकडे केंद्रीय पथकाचं लक्ष वेधण्यात आलं. या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणीला आजपासून सुरुवात होत असून, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना तसंच बीड जिल्ह्यांतल्या गावांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी करण्यात येणार आहे.

काल छत्रपती संभाजीनगर इथं दाखल झालेल्या पथकाला विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सविस्तर सादरीकरण केलं. यावेळी पर्जन्यमान, पावसातील खंड, खरीप पिकांची स्थिती, पिकांचं नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, धरणांतला पाणीसाठा, चारा तसंच उपग्रहाधारित पीक स्थिती निर्देशांकांची माहिती देण्यात आली.

विभागातल्या धरणांमध्ये सध्या केवळ ३० पूर्णांक सात टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. पुढील वर्षी ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी पाणीसाठा राखून ठेवण्याची आवश्यकता असल्यानं यंदाच्या रब्बी हंगामातल्या पेरणीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. जालना, धाराशिव तसंच लातूर या जिल्ह्यांमध्ये भूजल पातळी मागील पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा चार ते पाच मीटरने खाली गेल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

राज्याकडून सादर करण्यात आलेल्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करून त्याआधारे अहवाल सादर करण्यात येणार असल्याचं पथकाचे प्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांनी सांगितलं.

****

दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये मागणी करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला मोफत अन्नधान्य उपलब्ध करुन द्यायचे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचे लाभार्थी नसलेल्या नागरिकांना सुद्धा मोफत अन्नधान्य मिळणार आहे. शिधापत्रिका असलेल्या परंतु स्थलांतर केलेल्या कुटुंबांना जवळच्या स्वस्त धान्य दुकानातल्या ई–पॉस यंत्राद्वारे अन्नधान्य द्यायचे आदेशही सरकारनं दिले आहेत.

****

चाऱ्याची आवश्यकता असलेल्या गावांची तातडीने पाहणी करून गरजू शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी गावातच येत्या १२ तारखेपर्यंत चारा उपलब्ध करून द्यावा, अशी सूचना विधान परिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. लातूर जिल्ह्याच्या उदगीर तालुक्यातल्या करडखेल, दिग्रज आणि सताळा इथं दुष्काळी परिस्थितीची पाहणी केल्यानंतर त्या बोलत होत्या. २५ सप्टेंबर रोजी दुष्काळी उपाययोजनांबाबत शासन निर्णय जारी झाल्यानंतरही गंभीर दुष्काळग्रस्त भागात आवश्यक पाहणी झालेली दिसत नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

****

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर टंचाई निवारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले आहेत. काल जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. शेतकरी अडचणीत येऊ नये, हाच आपला प्रयत्न असल्याचं शिरसाट यांनी या बैठकीनंतर सांगितलं. ते म्हणाले..

**बाईट – पालकमंत्री संजय शिरसाट**

****

जालना जिल्ह्यातल्या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली काल बैठक घेण्यात आली. जिल्ह्यातल्या ९५४ गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती असून, आतापर्यंत सुमारे ६० टक्के गावांमध्ये पंचनामे पूर्ण झाले आहेत. आठवडाभरात पंचनामे पूर्ण करून अहवाल शासनाकडे पाठवावा आणि दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्याचं उद्दिष्ट ठेवावं, अशा सूचना मुंडे यांनी दिल्या.

****

लातूर जिल्ह्यात पाणी आणि चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या आहेत. मांजरा धरणातली पाणीचोरी आणि विविध जलप्रकल्पांमधला अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी कठोर कारवाईचे निर्देशही त्यांनी दिले.

बीड इथं जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली काल नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांची बैठक झाली. पाणीटंचाईग्रस्त भागात सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक निधीचे प्रस्ताव तातडीने जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

****

वस्तू आणि सेवा कर– जीएसटी परिषदेने कर अधिकाऱ्यांचे अटक करण्याचे अधिकार रद्द केले आहेत. काल नवी दिल्लीत जीएसटी परिषदेच्या बैठकीनंतर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ही माहिती दिली. पात्र असलेल्या ९० टक्के करदात्यांना तीन कार्यालयीन दिवसांत कर परतावा देण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं. परिषदेने खटला चालवण्यासाठीची आर्थिक मर्यादा एक कोटी रुपयांवरून

पाच कोटी रुपयांपर्यंत वाढवली आहे. विवरणपत्रासंबंधीच्या चुकांसाठी करावर व्याज आकारणी तसंच दंडाशिवाय कारवाई होणार असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनाचा २५ वर्षांचा प्रवास 'जनसेवा से देशसेवा' या मंत्राने प्रेरित असून, सेवा आणि सुशासनाच्या दृष्टिकोनातून २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार कार्यरत आहे. सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तनाचा प्रयत्न या कार्यातून होत आहे. अंतराळ विकासासाठी इन स्पेस संस्थेची स्थापना, हा याच कार्यवाहीचा भाग आहे. आज या संस्थेविषयी जाणून घेऊ,

**देशाच्या अंतराळ क्षेत्रात खासगी क्षेत्राचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारनं २४ जून २०२० रोजी अंतराळ क्षेत्रातील व्यापक सुधारणांना मंजुरी दिली. या सुधारणांमुळं अंतराळ क्षेत्रातील संशोधन, उत्पादन, प्रक्षेपण आणि सेवांमध्ये खासगी उद्योग आणि स्टार्टअप्सच्या सहभागाचा मार्ग मोकळा झाला. या सुधारणांअंतर्गत इंडियन नॅशनल स्पेस प्रमोशन अँड ऑथरायझेशन सेंटर अर्था इन स्पेस संस्थेची स्थापना करण्यात आली. खासगी कंपन्यांना भारतीय अंतराळ पायाभूत सुविधांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन,मार्गदर्शन आणि आवश्यक अधिकृतता देण्याची जबाबदारी IN-SPACe कडे सोपवण्यात आली.**

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**या सुधारणांमुळे देशाच्या अंतराळ क्षेत्रात सार्वजनिक-खासगी भागीदारीला संस्थात्मक स्वरूप मिळाले असून, देशाच्या अंतराळ अर्थव्यवस्थेच्या विस्तारासाठी नवी दालनं खुली झाली आहेत.**

****

विशेष पुनरीक्षण दरम्यान प्रारुप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांसाठी उद्या शनिवारी आणि परवा रविवारी मतदान केंद्रांवर विशेष मतदार नोंदणी शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. याशिवाय १२ ऑक्टोबरपूर्वी मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि BLO कडेही अर्ज सादर करता येतील. याशिवाय voters.eci.gov.in या वेबसाइटवर किंवा ECI NET ॲपवरही मतदार अर्ज भरू शकतात. युवा मतदारांची मोठ्या संख्येनं नोंदणी व्हावी,

यासाठी राज्यातल्या सर्व महाविद्यालयं आणि विद्यापीठांमध्ये विशेष शिबीरं आयोजित करण्यात येत आहेत.

****

ज्येष्ठ अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते नाना पाटेकर यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक मंत्री, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सर्वपक्षीय नेते आणि चाहते मोठ्या संख्येनं यावेळी उपस्थित होते. नाना पाटकेर यांचं पार्थिव विमानानं पुण्यात आणण्यात आलं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानतळावर पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं. पाटेकर यांचं काल पहाटे गोव्यात हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झालं, ते ७५ वर्षांचे होते.

****

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमात धाराशिव जिल्हा राज्यात अव्वल आला आहे. जिल्ह्यातल्या एकूण ७८ आयुष्मान आरोग्य वर्धिनी उपकेंद्रं आणि २३ प्राथमिक आरोग्य केंद्रं, अशा एकूण १०१ आरोग्य संस्थांचं राज्यस्तरीय तसंच राष्ट्रीय स्तरावरील पथकाद्वारे मूल्यांकन होऊन त्यांना राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्रं प्राप्त झाली आहेत. अशी कामगिरी करणारा धाराशिव हा राज्यातला एकमेव जिल्हा ठरला आहे.

****

सेवा संकल्प अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमात शून्य ते १८ वर्ष वयोगटातल्या मुलांची आरोग्य तपासणी केली जात आहे. तसंच
सेवा संकल्प अभियानांतर्गत धाराशिव इथं काल सायकल आणि ई–बाईक रॅली काढण्यात आली.

****